# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम

## अहवाल २०२२–२३

**दि. ०५.०६.२०२२ : ''जागतिक पर्यावरण दिवस आणि स्वच्छता सप्ताह'' साजरा**

श्री आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोलाच्या एन.एस.एस. युनिटच्या मार्गदर्शनाखाली मा. प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांनी ०५.०६.२२ रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला आणि २०२२ ह्या वर्षाची थीम ''फक्त एक पृथ्वी'' ही होती. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर यांच्यासह एन.एस.एस. स्वयंसेवकांनी कॅम्पस मधील बोटॅनिकल गार्डनची स्वच्छता केली आणि नवीन पोशन बॅग विकसित करण्यात आली. वनस्पती उद्यानातील वनस्पतीमध्ये सेंद्रिय खतांसह नवीन सुपीक माती रोपांना जोडण्यात आली. त्यावेळी आदरणीय प्राचार्यांनी भाजीपाला कसा पिकवता येतो आणि या भाज्या मुलींच्या वसतिगृहात आणि कॉलेजच्या कॅन्टीमध्ये वापरल्या जातात याबद्दल माहिती दिली. असे छोटे छोटे उपक्रम करून आपण पृथ्वी मातेचे संवर्धन करू शकतो असे त्यांनी स्वयंसेवकांना सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली आणि असे उपक्रम राबविण्यासाठी व आपली वसुंधरा आणि पर्यावरण, प्रदुषणमुक्त ठेवण्यासाठी सहभागी व्हा असे आवाहन केले.

श्री आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोलाच्या एन.एस.एस. युनिटने दि. ०५.०६.२०२२ रोजी जागतिक पर्यावरण दिन आणि स्वच्छता सप्ताहानिमित्त स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते. MGNCRE (महात्मा गांधी नॅशनल कौन्सिल फॉर रूरल एज्युकेशन) द्वारे प्लास्टिक बंदी आणि प्लास्टिक प्रदूषण मुक्त नदी उपक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी अकोला येथील मोर्णा नदीच्या पात्रात प्लास्टिक कचरा जमा करून स्वच्छता केली. याठिकाणी स्वयंसेवकांना नद्यांसह इतर जलस्त्रोतांमध्ये प्लास्टिक प्रदूषणामुळे होणाऱ्या घातक परिणामाची माहिती देण्यात आली. आपण सर्व जबाबदार नागरिक असल्याने पर्यावरण स्वच्छ आणि निरोगी ठेवणे आणि भावी पिढ्यांसाठी त्याचे संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे हे सांगण्यात आले. जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला आणि विद्यार्थ्यांनी एन.एस.एस. विभाग, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनानुसार आदरणीय प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम पार पडली.

**दि. ०७.०७.२०२२ : वृक्षारोपण कार्यक्रम (Greenery)**

दि. ७ जुलै २०२२ रोजी वन विभाग, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने वनमहोत्सव २०२२ निमित्य श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रा.से.यो. पथकाने वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड करण्याचे कार्य केले. हे कार्यक्रम शिवापूर, अकोला (वन–महोत्सव) येथे करण्यात आले. जिल्हा वन कार्यालय, अकोला यांच्या सहकार्याने सनसिटी जवळील शिवापूर येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. आदरणीय प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी आणि एस.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १५ रासेयो स्वयंसेवकांनी वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला. ३ वर्षापासून हा उपक्रम जिल्हा वन कार्यालयाच्या सहकार्याने केला जात आहे. आरएलटी टीमने एकूण १४३ रोपे लावली. आजच्या कार्यक्रमासाठी मा. अकोला जिल्हाधिकारी निमा अरोरा, मा.श्री. खडसे, श्री. अर्जुन के.आर., उप वनसंरक्षक उपस्थित होते. श्री. सुरेश वडोदे, सहाय्यक श्री. वनसंरक्षक श्री. इंगळे, राऊंड ऑफिसर व वनरक्षक राजेश बिडकर यांनी उपस्थित राहून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

लिंक : https://rltsc.edu.in/2022/07/10/plantation-drive-on-occasion-of-van-mahotsav-2022/

**दि. ०९.०८.२०२२ : निबंध स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धा**

महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने आझादी का अमृत महोत्सव ह्या निमित्याने निबंध स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. दि. १२.०८.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावयाचे होते. ७२ विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन ह्या राष्ट्रीय उत्सवास आपला सहभाग नोंदविला आणि उपक्रम यशस्वीरित्या पार पडले. मराठी आणि हिंदी भाषेत प्रत्येक एक असे निबंध निवडून त्यांना ५००/– रोख पारितोषिक दिल्या गेले. पोस्टर मेकिंग मध्ये सुद्धा उत्कृष्ट निवडून ५००/– रोख पारितोषिक दिले.

**दि. १२.०८.२०२२ : रांगोळी स्पर्धा**

रासेयो पथकाकडून कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांच्या मार्गदर्शनात ह्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी सुंदर रांगोळ्या काढून स्पर्धेला आपला सहभाग नोंदविला. विविध रंगांनी सजलेल्या रांगोळ्या सर्वांचे आकर्षण बनले.

**दि. १० व ११ ऑगस्ट २०२२ : महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना झेंडे वितरीत.**

महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी ह्यांनी २०० झेंडे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटकडून २०० व एन.सी.सी. कडून २५ आणि Physical Edu. and Sports विभागाने सुद्धा २५ असे ४५० झेड्यांचे वितरण करण्यात आले. महाविद्यालयातील संपूर्ण शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांना दि. १० व १२ ऑगस्ट २०२२ ला झेंडे वितरीत करण्यात आले व १३ – १५ ऑगस्ट २०२२ असे ३ दिवस आप–आपल्या घरी म्हणजेच ''हर घर तिरंगा अभियान'' राबविण्याचे आव्हान करून यशस्वीरित्या पार पडले.












**दि. १३.०८.२०२२ : भव्य रॅलीचे आयोजन**

''हर घर तिरंगा अभियान'' राष्ट्रीय उत्सव साजरा करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये एक भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता दाखविण्याकरिता विविध राज्यांची पारंपारिक वेशभूषा धारण करून विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शविली. १७५ लोकांनी ह्या रॅलीमध्ये आपला सहभाग नोंदविला.

**दि. १३.०८.२०२२ : पथ–नाट्याच्या सहाय्याने जनजागृती**

गावातील लोकांमध्ये आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत ''हर घर तिरंगा – घर घर तिरंगा'' अभियानाबद्दल जनजागृती करण्याकरिता विविध ठिकाणी पथ–नाट्याचे सादरीकरण करण्यात आले. रासेयो च्या स्वयंसेवकांनी सोप्या पद्धतीने लोकांना जागरूक करून हा राष्ट्रीय उत्सव साजरा करण्याचे आव्हान केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सुद्धा पथ–नाट्याच्या माध्यमातून उद्बोधन केले.

**दि. १४.०८.२०२२ : मा.डॉ. शंकर बाबा पापळकर ह्यांचे व्याख्यान व पथ–नाट्याचे सादरीकरण**

थोर समाजसेवक व अनाथांचे नाथ मा.डॉ. शंकर बाबा पापळकर ह्यांचे व्याख्यानाचे आयोजन NGO “Samartya Foundation” द्वारा श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात केल्या गेले. त्यांच्या समोर रासेयोच्या स्वयंसेवकांनी पथ–नाट्याचे सादरीकरण केले. ह्या कार्यक्रमाला IAS निमा अरोरा, जिल्हाधिकारी अकोला ह्यांची विशेष उपस्थिती लाभली.

**दि. १५.०८.२०२२ : स्वातंत्र्य दिवस व विविध उपक्रम**

महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण विभाग अमरावती ह्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे आझादी का अमृत महोत्सव साजरा करण्याकरिता दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ ला ''हर घर तिरंगा – घर घर तिरंगा अभियान'' अंतर्गत झेंडे फडकविण्यात आले. महाविद्यालयात १३ ते १५ ऑगस्ट असे ३ दिवस रोज सकाळी झेंडा उभारून संध्याकाळी उतरविण्यात आले. FLAG CODE च्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करून हा राष्ट्रीय सण साजरा केला गेला. ज्या स्पर्धांचे आयोजन केले गेले त्या सर्व विजेते स्पर्धकांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. राष्ट्रगीत गायन केल्या गेले. देशभक्तीपर गीत, नृत्य व गीतांचे सादरीकरण काही विद्यार्थ्यांनी केले. महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करून हा राष्ट्रीय उत्सव हर्षोल्हासात साजरा केला व देशप्रेम व एकात्मतेचा संदेश दिला.

**दि. ०५.०९.२०२२ : श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे शिक्षक दिन साजरा**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात दि. ०५.०९.२०२२ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाक्रिष्णन ह्यांच्या जयंतीला शिक्षक दिन साजरा केला गेला. महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी निबंध स्पर्धेचे आयोजन केले. शिक्षक दिनानिमित्य स्लोगन्स (घोष वाक्य) व कविता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, विषय होता – ''शिक्षक : समाज परिवर्तनाचे माध्यम''. दिलेल्या विषयावर कविता आणि घोष वाक्य हे मराठी किंवा इंग्रजीमध्ये मागविण्यात आले. दिलेल्या लिंकवर आपले नाव नोंदवून घोषवाक्य किंवा कविता लिहिली किंवा PDF मध्ये अपलोड केलीत. दोन्ही भाषांमधून एक घोषवाक्य व एक कविता निवडल्या गेले. बेस्ट स्लोगन व बेस्ट कविता करिता पारितोषिक प्रदान करण्यात आले.

**दि. २४.०९.२०२२ : ''राष्ट्रीय सेवा योजना'' स्थापना दिवस साजरा**

NSS Day च्या निमित्ताने एनएसएस युनिट कडून मलकापूर स्थित सूर्योदय बालगृह येथे कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर आणि डॉ. समाधान मुंडे ह्यांनी ६०००/– च्या उपयोगी वस्तू व खाद्य पदार्थांचे वितरण केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याकरिता आम्ही विविध बालगृह, अनाथ आश्रम, वृद्धाश्रमाला भेटी देवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आव्हान करीत असतो.

राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, हे आहे. महाविद्यालयाच्या परिसर स्वच्छ करणे, क्रीडांगणे तयार करणे, ग्रामीण विभागातील रस्ते बांधणे, प्रौढ शिक्षण, गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार, नागरी संरक्षण इ. कार्यक्रमांचा या योजनेत समावेश आहे. ही जाणीव निर्माण करण्याकरीताच राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली.

**दि. ०२.१०.२०२२ : महात्मा गांधी जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांच्या जयंती निमित्य श्री रा.ल.तो. महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने स्वच्छता दुतांचे सत्कार केले. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्य त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहिली. स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता दूतांनी महाविद्यालयाचे परिसर, वर्ग खोल्या स्वच्छ केल्या व संपूर्ण परिसर सॅनिटाईज करण्यात आले. रासेयो च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता केली व संत गाडगे महाराजांनी दिलेल्या ''स्वच्छते कडून समृद्धी कडे'' चा महामंत्र अंमलात आणण्याचे कार्य केले.

**२६ नोव्हेंबर २०२२ : भारतीय संविधान दिवस**

दि. २६.११.२०२२ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात संविधान दिवस साजरा केला केला. विद्यार्थ्यांना संविधान बद्दल माहिती देऊन शपथ देण्यात आली कि, ''संविधानात दिलेल्या सर्व गोष्टींचे मान राखून त्यांचे योग्य पालन करणार''. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी होते. विद्यार्थ्यांसाठी लायब्ररी मध्ये भारतीय संविधानाचे पुस्तक वाचन करण्याकरिता उपलब्ध केले गेले. २६ नोव्हेंबर ला रासेयो पथकाद्वारे संविधान दिवस साजरा केला गेला. संविधान चा मान राखण्याबद्दल शपथ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

**दि. २८ नोव्हेंबर २०२२ : महात्मा ज्योतिबा फुले ह्यांची पुण्यतिथी**

दि. २८ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या पुण्यतिथी निमित्य अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याबद्दल माहिती करून देण्यात आली.

**१ डिसेंबर २०२२ : जागतिक एड्स दिवस – रेड रिबन क्लबची स्थापना**

१ डिसेंबर २०२२ जागतिक एड्स दिवसाचे औचित्य साधून ''रेड रिबन क्लब'' ची स्थापना व गठन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना समाजात एड्स जनजागृती करावयास उद्बोधित केले.

**दि. २४.१२.२०२२ : रक्तदान शिबीर**

''रक्तदान–श्रेष्ठदान'' या संकल्पनेतून हे सामाजिक कर्तव्य पार पाडण्याकरिता रा.से.यो. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, क्षेत्रीय समन्वयक ह्यांनी एकजुटीने हे आव्हान स्वीकारले. ''चला तर मग रक्तदान करूया – सामाजिक बांधिलकी जपू या'' हि भावना मनात बाळगून दि. २४.१२.२०२२ रोजी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयातील रासेयो पथकाद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वर्गीय प्राचार्य श्री म.गो. जोशी ह्यांच्या स्मृति प्रित्यर्थ रक्तदान शिबिराचे प्रत्येक वर्षी २४ डिसेंबर ला आयोजन करण्यात येते. ३८ रक्तदात्यांनी ह्या शिबिरात रक्तदान केले. महाविद्यालयातील रा.से.यो. च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ. समाधान मुंडे, क्षेत्रिय समन्वयक व DMC समन्वयक डॉ. सुधीर कोहचाले ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालयातील एनसीसी व स्पोर्टस् विभाग सुद्धा ह्या सामाजिक कार्यात सहभागी झाले होते. प्रत्येकाने आपले कर्तव्य अचूकरित्या पार पाडण्याकरिता प्रयत्न केले. अकोला गर्व्हमेंट मेडिकल कॉलेज रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. विजय नानोटी, प्रमुख पाहुणे श्री. अनुप गोसावी,

रक्त संक्रमण अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला आणि वैद्यकीय समुपदेशक तायडे मॅडम ह्यांची विशेष उपस्थिती लाभली. २४ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ९ ते ११ ह्या कालावधीत महाविद्यालयाच्या सभागृहात हे कार्यक्रम यशस्वीरित्या घेण्यात आले. एनएसएस व डीएमसी आणि इतर विद्यार्थ्यांनी, स्वयंसेवकांनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिस्तीचे पालन करून रक्तदान केले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी ह्यांचे मार्गदर्शन लाभले व त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व रक्तदात्यांचे कौतुक करून आभार व्यक्त केले.

**दि. ०१.०१.२०२३ : No Vehicle Day पर्यावरण पूरक उपक्रम राबविला.**

१ जानेवारी २०२३ हा दिवस रा.से.यो. कडून No Vehicle Day म्हणून साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ह्या सर्वांना सायकल आणायची सक्ती करून इंधन वाचविण्याचे प्रयत्न केल्या गेले. तसेच प्रदूषणावर नियंत्रण करण्यासाठी सर्वांना आव्हान करण्यात आले. डॉ. रश्मी जोशी ह्यांनी पर्यावरण सुरक्षा करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे ही भावना विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याचे काम केले. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला हे उपक्रम राबविण्यात येत आहे.

**दि. १२.०१.२०२३ : युवा दिन साजरा**

''राष्ट्रीय युवा दिन'' साजरा करण्याकरिता श्री रा.ल.तो. सायन्स कॉलेज, अकोला च्या राष्ट्रीय सेवा योजना व पालक शिक्षक संघटना समिती आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने पालक आणि विद्यार्थ्यांसाठी ''कोविड महामारी दरम्यान पोषण सशक्तीकरण'' या विषयावर कार्यशाळा आणि संवादात्मक सत्राचे आयोजन केले होते. अतिथी वक्त्या म्हणून डॉ. सोनल कामे आंबेरे, सहाय्यक प्राध्यापिका, गृहविज्ञान, श्रीमती आर.डी.जी. महाविद्यालय, अकोला ह्या लाभल्या. आजच्या तरूणांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती आणि डॉ. कामे ह्यांनी कोविड महामारीच्या काळात तंदुरूस्त राहण्यासाठी सकस आहार आणि पोषण कश्याप्रकारे घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी सुमारे २०९ विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदविला होता. संवादात्मक सत्र खूप चांगले होते. अनेक विद्यार्थी व पालकांनी आपल्या शंकांबाबत पाहुण्या वक्त्याशी चर्चा केली. प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांनी उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपस्थितांना मूल्ये जपण्यासाठीचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ. रश्मी जोशी, डॉ. ए.एस. सावरकर, पालक शिक्षक संघाच्या समन्वयिका आणि श्री. शैलेष जयस्वाल, आयोजन समितीचे सदस्य म्हणून कार्य केले. संवाद सत्र हे यशस्वीरित्या पार पडले.

**दि. ११–१७ जानेवारी २०२३ : ''रस्ता सुरक्षा सप्ताह'' साजरा**

''रस्ता सुरक्षा सप्ताह'' दर वर्षी जानेवारी महिन्यात साजरा केला जातो. ११ ते १७ जानेवारी २०२३ हे ''रस्ता सुरक्षा सप्ताह'' म्हणून साजरा करण्यात आला. श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे रासेयो पथक व उप– प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. डॉ. रश्मी जोशी सावलकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या उपस्थितीत रासेयो स्वयंसेवकांनी ''रस्ता सुरक्षा जीवन रक्षा'' जनजागृती केली. डॉ. समाधान मुंडे, कार्यक्रम अधिकारी, प्रा. शैलेश जयस्वाल व प्रा. सोनाली गवांदे, सह–कार्यक्रम अधिकारी ह्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. मा. प्राचार्य डॉ. नानोटी ह्यांनी उप–प्रादेशिक परिवहन विभागाचे आभार व्यक्त केले.

**दि. १९.०२.२०२३ : छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात दि. १९.०२.२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे, नॉन टिचिंग प्रमुख श्री. चंद्रकांत अहिरकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या

सुरवातीला शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आजच्या युवा पिढीने शिवाजी महाराजांचे चरित्र वाचून आपले व्यक्तिमत्व विकास करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अगदी शिवमय वातावरणात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे ह्यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली.

**दि. २३ फेब्रुवारी २०२३ : संत गाडगे बाबा जयंती**

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे व डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगे बाबा ह्यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेवून विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन करण्यात आले. रासेयो चे आराध्य दैवत संत गाडगे बाबा ह्यांच्या दश–सुत्री बद्दल जागृती करण्यात आली. त्यांनी दिलेला स्वच्छतेतून समृद्धीकडे चा मार्ग अवलंबिला पाहिजे असे आव्हान केले.

**२०२२–२३ मधील राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर व तसेच राज्यस्तरीय साहसी शिबिरात रासेयोच्या स्वयंसेवकांचा सहभाग**



**Ku. Mrunmayi Bobade**
Participated at State Level Avhan Camp at North Maha. University Jalgaon



**Gaurav Metkar**
Participated at State Level Avhan Camp at North Maha. University Jalgaon



**Sumit Wankhade**
Participated at State Level Avhan Camp at North Maha. University Jalgaon



**Ku. Mrunal Lahute**
Participated at State Level Adventure Camp at Chikhaldara

**दि. १४ एप्रिल २०२३ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सलग १४ तास अभ्यासाचे एक आगळे वेगळे स्तुत्य उपक्रम राबवून महामानवाला आदरांजली वाहिली.

## वृत्तपत्र कात्रणे



लोकमत

डॉ. शंकरबाबा पापळकर यांचे अकोल्यात प्रतिपादन

# 'होश'मध्ये जगाल तर क्रांती घडणारच!

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला** : प्रत्येकजण काम करीत असतो; मात्र रोजगार, शिक्षणासाठी एकमेकांना साहाय्य करून झटणे म्हणजे खरं काम आहे. जीवन जगताना होशमध्ये राहिलात, तर नक्कीच क्रांती घडणार, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. शंकरबाबा पापळकर यांनी रविवारी (दि. १४) अकोल्यात केले. सामर्थ्य फाउंडेशनने आरएलटी कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, तसेच प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी निमा अरोरा, आरएलटी कॉलेजचे प्राचार्य व्ही. डी. नानोटी, निवासी उपजिल्हाधिकारी संजय खडसे, उपविभागीय अधिकारी नीलेश अपार, ॲड. मोतीसिंह मोहता, डॉ. जीशान हुसेन, पवनकुमार माहेश्वरी, सामर्थ्य फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे, गजानन नारे, विनोद देव, राजकुमार उखडकर, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामर्थ्य फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे यांनी केले.

याप्रसंगी वझ्झर येथील अंबादासपंत वैद्य दिव्यांग बेवारस बालगृहाचे संस्थापक, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. पापळकर यांनी अकोल्यातील इतिहासाचा उजाळा दिला. तसेच प्रत्येकाने देशासाठी स्वयंस्फूर्तीने काम केले पाहिजे, असे आवाहनही केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी नाट्य सादर केले होते. त्या नाट्याचे डॉ. शंकरबाबा पापळकर यांनी कौतुक करीत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

**जगातील टॉप विद्यापीठांच्या यादीत देशाचे नाव नसणे ही शोकांतिका**

आज विज्ञान युग असून, प्रत्येकजण आपल्या पाल्याला चांगले शिक्षण मिळावे, यासाठी प्रयत्न करीत असतो. मात्र, जगातील टॉप १०० विद्यापीठाच्या यादीत देशाच्या एकाही विद्यापीठाचे नाव नसणे ही शोकांतिका आहे. प्रत्येकाने शिक्षणासाठी झटणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन डॉ. शंकरबाबा पापळकर यांनी कार्यक्रमात केले.

Hello Akola
Page No. 1 Aug 17, 2022
Powered by: erelego.com

# आरएलटीच्या मृण्मयी बोबडेसह तीन रासेयो स्वयंसेवकांचा राज्यस्तरीय 'आव्हान-२०२२' मध्ये सहभाग



**अकोला:** स्थानिक द बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मृण्मयी बोबडे हिच्यासह तीन स्वयंसेवकांनी राज्यस्तरीय 'आव्हान २०२२' शिबिरामध्ये सक्रीय सहभाग नोंदविला. १९ ते २८ डिसेंबर या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे राज्यस्तरीय रासेयो शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय शिबीरात सदर प्रशिक्षण देण्यासाठी ५बी-एनडीआरएफ पुणे यांची ४० जणांची चमू आली होती. तज्ज्ञ म्हणून 'एनडीआरएफ'चे अनंता बाभुळकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात हे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरामध्ये स्थानिक ➤ पान २ वर

## देशोन्नती

# आरएलटीच्या मृण्मयी बोबडेसह तीन रासेयो स्वयंसेवकांचा राज्यस्तरीय 'आव्हान-२०२२' मध्ये सहभाग

❒ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे आयोजन ❒ आपत्ती व्यवस्थापनाची चित्तथरारक प्रात्यक्षिके

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ▪ स्थानिक द बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मृण्मयी बोबडे हिच्यासह तीन स्वयंसेवकांनी राज्यस्तरीय 'आव्हान २०२२' शिबिरामध्ये सक्रीय सहभाग नोंदविला. १९ ते २८ डिसेंबर या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे राज्यस्तरीय रासेयो शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



या राज्यस्तरीय शिबीरात सदर प्रशिक्षण देण्यासाठी ५बी-एनडीआरएफ पुणे यांची ४० जणांची चमू आली होती. तज्ज्ञ म्हणून 'एनडीआरएफ'चे अनंता बाभुळकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात हे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरामध्ये स्थानिक आरएलटी विज्ञान महाविद्यालयाची बीएससी-१ ची मृण्मयी संजय बोबडे, सुमीत वानखडे आणि गौरव मेतकर या रासेयो स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदवला. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना विविध आपत्तींच्या वेळी गोंधळ उडू न देता कशाप्रकारे सामना करायचा याबद्दल प्रात्यक्षिके देऊन, त्यांच्यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे कौशल्य व आत्मविश्वास वाढविण्याचे काम करण्यात आले. विविध प्रयोगांद्वारे जसे, CPR देणे, पूरपरिस्थिती निर्माण झाल्यावर, इमारतीत आग लागल्यावर किंवा इमारत कोसळली असताना अशा





आपत्तींना कसे सामोरे जावे हे शिकविण्यात आले. स्थानिक आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी- सावलकर, डॉ. समाधान मुंडे यांच्या मार्गदर्शनात मागील ५ वर्षांपासून अनेक विद्यार्थ्यांना अशा विविध शिबिरांमध्ये पाठविण्यात आले. या माध्यमातून त्यांचा व्यक्तिमत्त्व व बौद्धिक विकास करून त्यांच्यामध्ये विविध कौशल्य व आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य केले. आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या विशेष मार्गदर्शनात आरएलटी परिवारातील प्रत्येक घटक नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करीत असतो. महाविद्यालयाच्या रासेयो पथकाला मागील ५ वर्षांमध्ये तब्बल १० पुरस्कार प्राप्त झाले आहेत, हे त्याचे फलित आहे. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी व महाविद्यालय नेहमीच नवीन पिढीचे सर्वांगीण विकास करून यशस्वी समाज घडविण्याचे विशेष कार्य मागील पाच दशकांपासून सातत्याने करीत आहे, हे येथे उल्लेखनीय.

**अमरावती विद्यापीठ ठरले राज्यातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ!**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित या राज्यस्तरीय शिबिरामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला, महाराष्ट्रामधील सर्व विद्यापीठातून रासेयोकडून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल 'सर्वोत्कृष्ट विद्यापीठ' म्हणून गौरवांकित करण्यात आले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे रासेयोचे संचालक डॉ. राजेश बुरंगे यांच्या विशेष मार्गदर्शनात विद्यापीठातील अमरावती विद्यापीठ अंतर्गत पाच जिल्ह्यांमधून रासेयोला प्रगतिपथावर नेण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे.

**लोकमत समाचार**

# आरएलटी के रासेयो विद्यार्थियों ने की राज्य स्तरीय शिविर में सहभागिता



**अकोला** : दि बेरार एजूकेशन सोसाइटी द्वारा संचालित आरएलटी विज्ञान महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना के तीन स्वयंसेवकों ने राज्यस्तरीय चुनौती 2022 शिविर में सहभागिता की. शिविर का आयोजन जलगांव के बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विश्वविद्यालय में किया गया था. प्रशिक्षण देने के लिए पुणे के आपदा प्रबंधन की टीम शिविर में शामिल हुई थी. विशेषज्ञ के रूप में एनडीआरएफ के अनंता बाभुलकर उपस्थित थे.इस शिविर में बीएससी 1 के मृण्मयी बोबड़े, सुमित वानखड़े तथा गौरव मेतकर ने सहभागिता की.प्रशिक्षण के दौरान विद्यार्यिों को विभिन्न आपदा के समय किसी तरह धीरज बंधाते हुए उसका सामना करना है, इसका प्रात्यक्षिक दिखाया गया. शिविरार्थियों में आपदा प्रबंधन कौशल एवं आत्मविश्वास बढ़ाने की कोशिश की गई. इसमें सीपीआर देना, बाढ़ की स्थिति, इमारत में आग लगने अथवा इमारत ढ़हने आदि तरह की आपदा का कैसे सामना करें, आदि बताया गया.

आरएलटी विज्ञान महाविद्यालय के रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मि जोशी सावलकर, डॉ.समाधान मुंडे के मार्गदर्शन में बीते 5 वर्षों से अनेक विद्यार्थियों को इस तरह के विभिन्न शिविरों में भेजा गया. व्यक्तित्व एवं बौद्धिक विकास कर उनमें विभिन्न कौशल तथा आत्मविकास बढ़ाने की कोशिश की गई. इस राज्यस्तरीय शिविर में संत गाड़गे बाबा अमरावती विश्वविद्यालय को राज्य में सवोकृष्ट विश्वविद्यालय के रुप में सम्मान दिया गया. अमरावती विश्वविद्यालय के रासेयो के संचालक डॉ.राजेश बुरंगे के मार्गदर्शन में विश्वविद्यालय के पांच जिलों से रासेयो को उन्नति पथ पर ले जाने का उल्लेखनीय काम किया गया. आरएलटी विज्ञान महाविद्यालय के प्राचार्य डॉ.वी.डी.नानोटी के मार्गदर्शन में आरएलटी महाविद्यालय के रासेयो दल को बीते 5 वर्ष में 10 पुरस्कार प्राप्त हुए हैं. इन सभी विद्यार्थियों की सराहना की जा रही है.

# रस्ता वाहतूक अपघातात बळी ठरलेल्या नागरिकांचा जागतिक स्मृती दिन



**अकोला** ▪ रस्ता वाहतूक अपघातात बळी ठरलेल्या नागरिकांसाठी जागतिक स्मृती दिनानिमित्त येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय अकोलाच्या वतीने वॉकिथॉनचे आयोजन करून वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यात आली.

**उपप्रादेशिक परिवहन विभागातर्फे 'वॉकेथॉन'**

येथील संत तुकाराम चौक ते आरटीओ मैदानपर्यंत या वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. रस्ता अपघातग्रस्ताचे वडील राजेंद्र देशमुख यांनी हिरवी झेंडी दाखविली. या रॅलीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अकोला, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, एनसीसीचे छात्र, पीडीकेव्ही कॉलेज, एलआरटी कॉलेज, आरएलटी कॉलेज, सीताबाई आर्ट्स कॉलेज, श्री शिवाजी कॉलेज, माउंट कारमेल स्कूल, खंडेलवाल स्कूल, श्रीमती देवकाबाई देशमुख प्राथमिक विद्यालय, स्कूल ऑफ स्कॉलर्स इत्यादीचे विद्यार्थी व अस्तित्व फाउंडेशन एनजीओ, प्रभात किड्स स्कूल बसचालक, एमएसआरटीसी बसचालक, ट्रॅफिक पोलिस, मोटर ड्रायव्हिंग स्कूल, ऑटो डीलर्स, संचालक व ट्रान्सपोर्ट असोसिएशन आदींचा सहभाग होता.

**आरटीओनी दिली रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा!**

वॉकेथॉन रॅली आरटीओ मैदानावर पोहोचल्यानंतर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयश्री दुतोंडे यांनी रॅलीला संबोधित करून त्यांनी स्वलिखित रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा दिली. स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या बाल कलाकारांनी पथनाट्य 'तू तुझा रक्षक' सादर करून रस्ता सुरक्षा नियम पाळण्याबाबत संदेश दिला.

**रस्ते अपघातात जीव गमावलेल्यांना वाहली श्रध्दांजली!**

रस्ता अपघातात आपला जीव गमावलेल्या नागरिकांसाठी एक मिनिट स्तब्ध राहून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. रस्ता अपघातात बळी ठरलेल्या व्यक्तींचे कुटुंबीय असलेले भीमराव जाधव व प्रमोद इंगळे यांचीही यावेळी उपस्थिती होती. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयश्री दुतोंडे यांनी रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सहायक मोटर वाहन निरीक्षक मनोज शेळके, प्रास्ताविक मोटार वाहन निरीक्षक हेमंत खराबे व आभार प्रदर्शन सहायक मोटार वाहन निरीक्षक लेनिन ढाले यांनी केले.

# छायाचित्रे







५ जून २०२२ रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याकरिता रासेयो चमुने महाविद्यालयातील रोपवाटिकेत सेंद्रिय खत मिश्रित माती रोपट्यांना दिली.




५ जून २०२२ रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याकरिता रासेयो चमुने कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांच्या नेतृत्वात रासेयोच्या विद्यार्थ्यांनी अकोलाच्या मोर्णा नदी काठी प्लास्टिक कचरा गोळा करून महानगरपालिका, अकोला ह्यांना मदत केली.




दि. ६.६.२०२२ शिव स्वराज्य दिन साजरा



दि. २६.६.२०२२ आंतर राष्ट्रीय योग दिवस

दि. ७.७.२०२२ रोजी अकोला जिल्हा वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने रासेयोच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी आणि स्वयंसेवकांकडून शिवापूर (मलकापूर) येथे वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात आला.










दि. ७.७.२०२२ रोजी अकोला जिल्हा वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने रासेयोच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी आणि स्वयंसेवकांकडून शिवापूर (मलकापूर) येथे वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात आला.
वनमहोत्सव निमित्त्य १४३ झाडे लावण्यात आली.












दि. ६.८.२०२२ रोजी जिल्हास्तरीय सभेचे आयोजन श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो कडून करण्यात आले. त्या कार्यक्रमा प्रसंगी दीप प्रज्वलन करतांना सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाचे रासेयो संचालक डॉ. राजेशजी बुरंगे व प्रमुख पाहुणे जॉइंट डायरेक्टर मा.श्री. केशवजी तुपे




पथनाट्याच्या सहाय्याने अमृत महोत्सव निमित्य एस.टी. बस स्थानकावर जनजागृती करण्यात आली.




अमृत महोत्सव निमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन




७६ वा स्वातंत्र्य दिवस श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात उत्साहात साजरा केल्या गेले, विविध समूह नृत्य व गीत गायनाचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण करून राष्ट्रीय उत्सव साजरा केला.






डी.लिट उपाधीने विभूषित, थोर समाजसेवक मा.श्री. पापळकर बाबा ह्यांनी रासेयोच्या विद्यार्थ्यांचे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांचे मार्गदर्शन केले.







दि. ५.९.२०२२ ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून शिक्षक दिन साजरा केला व त्या निमित्य घोषवाक्य व कविता स्पर्धेचे आयोजन केल्या गेले.







दि. २४.०९.२०२२ राष्ट्रीय सेवा योजनाचे स्थापना दिवसाचे औचित्य साधून रासेयोच्या डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे आणि विद्यार्थ्यांनी ६०००/– चे खाद्य पदार्थ व आवश्यक वस्तूंचे सूर्योदय बालगृह (मलकापूर) येथे अनाथ बालकांना वितरीत केले.








दि. २.१०.२०२२ ला महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीला स्वच्छता दुतांचे एन–९५ मास्क व सॅनिटायजर्स देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्यासोबत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे परिसर स्वच्छ केले.




दि. २.१०.२०२२ ला महात्मा गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री जयंतीला विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे परिसर स्वच्छ केले. पथ नाट्याच्या सहाय्याने एस.टी. स्टॅन्ड, गावातील विविध वाटिका व इतर ठिकाणी स्वच्छता केली.






रासेयो पथकाकडून दि. ३१.१०.२०२२ एकता दिवस म्हणून सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या जयंती निमित्य अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.  तसेच प्रथम प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी ह्यांच्या पुण्यतिथी निमित्य श्रद्धांजली वाहिली.








दि. २६.११.२०२२ रोजी महाविद्यालयात संविधान दिवसाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून विद्यार्थी व शिक्षक ह्यांना शपथ देण्यात आली.




दि. २०.११.२०२२ रोजी अकोला उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून आयोजित World Accident Memorial Day रैलीमध्ये रासेयोच्या विद्यार्थ्यांचा सहभाग.







दि. ६.१२.२०२२ रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या प्रतिमेला हारार्पण करून अभिवादन कार्यक्रम आयोजित केल्या गेले.







दि. २०.१२.२०२२ ला संत गाडगे महाराज ह्यांच्या पुण्यतिथीला अभिवादन कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना गाडगे महाराजांच्या दश-सूत्री बद्दल माहिती देण्यात आली.









महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य स्वर्गीय म.गो. जोशी ह्यांच्या स्मृति प्रित्यर्थ रक्तदान शिबीर दि. २४.१२.२०२२ रोजी आयोजित करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.




दि. १२.०१.२०२३ ला स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ ह्यांच्या जयंतीला युवा दिवस साजरा




दि. ३०.०१.२०२३ रोजी महात्मा गांधीजी ह्यांची पुण्यतिथीला अभिवादन केले.






दि. १९.०२.२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज ह्यांची जयंती साजरी







दि. १४.०४.२०२३ ला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला '१४ तास अभ्यास' चा उपक्रम राबविण्यात आला.






दि. ११.०४.२०२३ रोजी महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या जयंती निमित्य अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन.






जागतिक योग दिवस दि. २१.०६.२०२३ रोजी साजरा

**डॉ. रश्मी जोशी सावलकर**
**डॉ. समाधान मुंडे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर – ग्राम आपोती (खुर्द)

## अहवाल २०२२–२३

**शनिवार, दि. ११.०३.२०२३ : आगमन, पूर्वतयारी, स्वच्छता व नोंदणी**

ग्राम आपोती (खु.) येथे दि. ११.०३.२०२३ रोजी विद्यार्थ्यांचे आगमन झाले. यानंतर विद्यार्थ्यांची नोंदणी व पूर्वतयारी करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रम परिसर कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर विद्यालय येथे स्वच्छता करण्यात आली तसेच गावकऱ्यांसोबत चर्चा व प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी ग्राम पंचायत मध्ये सरपंच, उपसरपंच, महिला प्रतिनिधी व पोलिस पाटील ह्यांना बोलावून सभा घेण्यात आली. तसेच बचत गटाच्या महिलांच्या सुद्धा २ सभा घेण्यात आल्या, ज्यामध्ये त्यांना शिबिरातील कार्यक्रमाबद्दल माहिती पुरविण्यात आली व सहभागी होण्याचे आव्हान करण्यात आले. ''उन्नत भारत अभियान, स्वच्छ भारत स्वस्थ भारत'' अभियान अंतर्गत ग्राम आपोती (खु.) येथे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची व कार्यक्रमाची माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे यांनी गावकऱ्यांना दिली.

**रविवार, दि. १२.०३.२०२३ : उद्घाटन समारोह**

ग्राम आपोती (खु.) येथे श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन १२ मार्च २०२३ रोजी पार पडले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून मा.ॲड. मोतीसिंहजी मोहता, अध्यक्ष, दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला आणि महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. व्ही.डी. नानोटी, श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला हे उपस्थित होते व उद्घाटक म्हणून क.शि.प्र. संस्था आपातापा चे प्राचार्य व अध्यक्ष श्री. शांतारामजी बुटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण व पूजन व विद्यापीठ गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रश्मी जोशी कार्यक्रम अधिकारी ह्यांनी केले तर संचालन डॉ. समाधान मुंडे ह्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांनी आपल्या भाषणात शिबिरार्थ्यांचे मार्गदर्शन केले व गावातील लोकांमध्ये जनजागृती करण्याचे आव्हान केले व शिबिराच्या यशस्विते करिता शुभेच्छा दिल्या.

**सांस्कृतिक कार्यक्रम**

सायंकाळच्या सत्रात स्फूर्ती गीत व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. शिबिरार्थ्यांना सर्व ६ दिवसाची माहिती देण्यात आली व विविध गट बनवून कार्याचे वाटप करण्यात आले.

**सोमवार, दि. १३.०३.२०२३**

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात योग व्यायाम, प्रार्थना करून शिबिरार्थ्यांना गावात जनजागृती करण्याकरिता प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण गावात विद्यार्थ्यांनी पथनाट्याचा सहाय्याने गावकऱ्यांचे उद्बोधन केले. जागोजागी, गर्दीच्या ठिकाणी पथ नाट्याचे सादरीकरण करण्यात आले. स्वच्छतेचे नारे लावत प्रभात फेरी काढण्यात आली.

**कार्यक्रम : "Role of Gender Equality in Society"**
**सादरकर्ते : डॉ. सोनल कामे (सहा. प्रा. गृहविज्ञान वि. प्रमुख, श्रीमती आर.डी.जी. महिला महा., अकोला)**

डॉ. सोनल कामे, सहा. प्रा. गृहविज्ञान वि. प्रमुख, श्रीमती आर.डी.जी. महिला महा., अकोला ह्यांच्या

व्याख्यानाचे आयोजन शिबिराच्या तिसऱ्या दिवशी दुपारच्या सत्रात आयोजित केले होते. "Role of Gender Equality in Society" ह्या विषयावर त्यांनी विद्यार्थी तसेच गावकऱ्यांचे उद्बोधन केले. आज समाजात पुरूष व महिला समानतेचा गरज एकण्यात येतो, पण ही समानता कितपत समाजाने मान्य केली आहे ? काय त्याचे फायदे आहे ? आणि समाजात Equality असणे का गरजेचे आहे ? ह्याबद्दल सुंदर असे मार्गदर्शन डॉ. कामे ह्यांनी केले.

**कार्यक्रम : ''मूल्यशिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास''**
**सादरकर्ते : मा.श्री. जीवनजी देशमुख (सामाजिक कार्यकर्ते)**

श्रमसंस्कार शिबिराच्या तिसऱ्या दिवशी दुपारच्या सत्रात सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. जीवनजी देशमुख यह्यांनी ''मूल्यशिक्षण आणि वव्यक्तिमत्व विकास'' ह्या विषयावर विद्यार्थ्यांचे व गावकऱ्यांचे अतिशय साध्या आणि सोप्या पद्धतीत उद्बोधन केले. धकाधकीच्या ह्या जीवनात घर आणि कार्यालय सांभाळणाऱ्या महिला वर्ग व पुरुष ह्यांना तणावापासून कसे दूर राहावे आणि जर तणाव असले तरी साध्या छोट्या उपाय जसे कि ध्यान करणे हे ताण कमी करू शकतो हे सर्वांना पटवून दिले. मूल्य शिक्षणाची गरज समाजातील विकास वाढविण्याकरीता अतिशय महत्वाची आहे हे पटवून दिले.

**कार्यक्रम : ''महिलांसाठीचे व्यायाम आणि पोषणाचे महत्व''**
**सादरकर्ते : मा. कल्याणी सिंग (NGO क्षितीज फाऊंडेशन, MOU अंतर्गत)**

श्रमसंस्कार शिबिराच्या तिसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सत्रात मा. कल्याणी सिंग ज्या NGO क्षितीज फाऊंडेशन, MOU अंतर्गत सदस्य म्हणून गावातील महिलांचे व रासेयोच्या विद्यार्थिनी चे व्यायाम कसे असावेत व पोषण आहार काय घ्यावे ? जेणेकरून कि आरोग्य सुदृढ राहतील व महिलांमधील हिमोग्लोबिनची कमतरता, थायराइड व हार्मोनचे समतोल राखण्यासंबंधीचे व्यायाम व आहार बद्दलची उत्कृष्ट माहिती दिली. महिलांनी ह्या कार्यक्रमात मा. कल्याणी सिंग ह्यांच्यासोबत हितगुज करून भरपूर माहिती घेतली.

**मंगळवार, दि. १४.०३.२०२३**
**कार्यक्रम : ''NCD (Non Communicable Diseases) मोफत तपासणी शिबिर''**
**सादरकर्ते : मा.डॉ. जगदीश बनसोड, आरोग्य अधिकारी, अकोला तालुका**
**मा.डॉ. श्रीकांत भेंडेकर, PHC आपातापा आरोग्य अधिकारी**

शिबिराच्या चवथ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात आरोग्य संवर्धन करण्याकरिता जनजागृतीपर NCD तपासणी शिबिराचे आयोजन केल्या गेले. ह्या शिबिरा दरम्यान ४० गावकऱ्यांची रक्तदाब, ब्लड शुगर, आणि इतर आजारांची मोफत तपासणी करण्यात आली. ह्या मोफत शिबिराचे आयोजन अकोला आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. मा.डॉ. जगदीश बनसोड, आरोग्य अधिकारी, अकोला तालुका आणि मा.डॉ. श्रीकांत भेंडेकर, PHC आपातापा आरोग्य अधिकारी ह्यांचे विशेष सहकार्य लाभले.

**कार्यक्रम : ''निक्षय योजना'' बद्दलची माहिती व व्याख्यान**
**सादरकर्ते : डॉ. अनुपमा गवई (आपातापा PHC अकोला)**

शिबिराच्या चवथ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात आरोग्य संवर्धन करण्याकरिता जनजागृतीपर ''निक्षय योजना'' बद्दलची माहिती देण्याकरिता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. डॉ. अनुपमा गवई (आपातापा PHC अकोला) ह्यांनी भारत सरकार ने नवीन योजना ची असहाय रोग्यांकरीता सुरू करण्यात आली आहे त्याबद्दलची संपूर्ण माहिती दिली. त्या योजने प्रमाणे क्षय रोग्यांकरिता फूडकिट्स देणे व काही महिन्यांसाठी त्यांना दत्तक घेऊन त्यांना ह्या फूड किट्सच्या माध्यमातून मदद करणे, जेणेकरून कि क्षय रोग हा समूळ संपुष्टात आणता येईल.

**कार्यक्रम : ''रक्तगट तपासणी शिबिर व पर्यावरण संवर्धन काळाची गरज''**

शिबिराच्या चवथ्या दिवशीच्या दुपारच्या सत्रात डॉ. हरीश मालपाणी, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, प्रमुख, श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला ह्यांनी ''पर्यावरण संवर्धन काळाची गरज'' ह्या विषयावर विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. पर्यावरण बद्दलची खूप सुंदर माहिती प्रस्तुत केली. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाकडून गावातील शालेय विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. रासेयो शिबिराच्या एका दिवसाला असे विविध आरोग्य शिबिर राबविण्यात येत असते. ९वी आणि १0वीच्या १00 शालेय विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासून देण्यात आले. हे शिबीर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मालपाणी व प्राध्यापिका सोनाली गवांदे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी त्याकरिता मा.डॉ. मालपाणी, डॉ. मुंडे आणि डॉ. जोशी ह्यांचे आभार मानले.

**कार्यक्रम : ''शेतकरी मेळावा'' (रेशीम शेतीचे महत्व आणि मधुमक्षिका पालन : शेतीपूरक उद्योग)**
**सादरकर्ते : मा.श्री. टी.बी. नरवाडे, रेशीम विकास अधिकारी, अकोला जिल्हा**
**मा.श्री. एस.यु. मानकर, रेशीम क्षेत्रिय अधिकारी, अकोला जिल्हा**
**मा.डॉ. अर्चना सावरकर, सह. प्रा., श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला**

शिबिराच्या चवथ्या दिवशी सायंकाळच्या सत्रात एक दिवसीय कार्यशाळेचे (शेतकरी मेळाव्याचे) आयोजन करण्यात आले. एनएसएसच्या विशेष शिबिरात उन्नत भारत अभियान (UBA) अंतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये रेशीम शेती व मधुमक्षिका पालन हे जोड उद्योग म्हणून कसे फायद्याचे हे मार्गदर्शन करण्यात आले. श्री. पी.बी. नरवाडे साहेब, रेशीम विकास अधिकारी, अकोला, श्री. विजय ठाकरे, प्रकल्प अधिकारी, अकोला, श्री. सुनील मानकर, क्षेत्र सहाय्यक, श्री. ललित येवले, क्षेत्र सहाय्यक ह्यांनी सुंदर असे मार्गदर्शन केले. डॉ. अर्चना सावरकर ह्यांनी मधुमक्षिका पालन ह्या विषयावर आपले व्याख्यान दिले व सर्वांना सुंदर अशी माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले तर एन.एस.एस. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे व सह कार्यक्रम अधिकारी श्री. शैलेष जयस्वाल आणि शिबिरार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले व कार्यशाळेला यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये ''रेशीम शेतीचे महत्व'' ह्या विषयावर मा.श्री. टी.बी. नरवाडे, रेशीम विकास अधिकारी, अकोला जिल्हा ह्यांनी अतिशय सुंदर असे शेतकऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. मा.श्री. एस.यु. मानकर, रेशीम क्षेत्रिय अधिकारी, अकोला जिल्हा, ह्यांनी मनरेगा योजने अंतर्गत रेशीम शेती सुरू करण्याकरिता मिळणाऱ्या सहायता व लाभ याबद्दलची संपूर्ण माहिती देऊन शेतकऱ्यांना रेशीम शेतीचे महत्व व लाभ पटवून दिले. त्यांनी जोड उद्योग म्हणून रेशीम शेती कशी फायद्याची आहे ह्या बद्दल गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

मा.डॉ. अर्चना सावरकर, सह. प्रा., श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला ह्यांनी मधुमक्षिका पालन हे किती सुंदर आणि सहजरित्या पारंपारिक शेती सोबत आपण जोड उद्योग म्हणून सुरू करू शकतो ह्याबद्दल मार्गदर्शन केले.

**बुधवार, दि. १५.0३.२0२३**
**कार्यक्रम : ''व्यसन मुक्ती मानव जीवन मूल्य''**
**सादरकर्ते : मा.डॉ. अजयजी उपाध्याय (गायत्री परिवार, अकोला)**

दुपारी ३.00 वाजता घेण्यात आलेल्या व्यसनमुक्ती आंदोलन या कार्यक्रमासाठी डॉ. अजय उपाध्याय हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते. तरूण वयातच या व्यवसांना आपण कसे बळी पडतो व त्यानंतर व्यवनाधीन होतो हे अगदी सविस्तर समजावून सांगितले व अंमली पदार्थांचे कशा प्रकारे व्यसन लागते ते शास्त्रीय पद्धतीने समजावून सांगितले. व्यसनामुळे होणारी शरीराची हानी कशी न भरून काढण्यासारखी असते हे सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे शिबिरार्थींना आवाहन केले तसेच व्यसन लागले असेल तर त्यापासून कशी सुटका करता येते याविषयी मार्गदर्शन केले व

काही क्रांती गीते सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन महेश जंजाळ तर आभार प्रदर्शन कु. प्रगती नवलकार या विद्यार्थ्यांनी केले.

**कार्यक्रम : ''जागतिक मंदी ? रूपया विरूद्ध डॉलर''**

**सादरकर्ते : मा.श्री. व्ही.एल. रूईवाले, अकोला**

आजघडीला भारतीय अर्थव्यवस्थे समोरील सर्वात मोठे आणि महत्वाचे आव्हान म्हणजे रूपयाचे अवमूल्यन किंवा घसरण. हाच मुद्दा धरून डॉलरच्या तुलनेत रूपयाची घसरण का होते व घसरण झाल्यामुळे अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतात, याबद्दल श्री. रूईवाले यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच या विषयावरील विद्यार्थ्यांच्या शंका आणि प्रश्नांना श्री. रूईवाले यांनी विस्तृत उत्तरे देत त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे संचलन शिवराज ठाकरे व आभार प्रदर्शन पांडुरंग वाघमारे या विद्यार्थ्यांनी केले.

**कार्यक्रम : 'कायदेविषयक मार्गदर्शन'**

**मा.ॲड. मोतिसिंहजी मोहता (अध्यक्ष, दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला तसेच सदस्य, महाराष्ट्र गोवा बार असोसिएशन व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला)**

दुपारच्या सत्रात 'कायदेविषयक मार्गदर्शन' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा.ॲड. मोतीसिंहजी मोहता तर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले विद्यमान न्यायाधिश मा.एस.एस. बोस (दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर), श्री. डी.जी. वन्तरम (अतिरिक्त सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर) आणि श्री. व्ही.डी. गिते (अतिरिक्त सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर), प्राचार्य मा.डॉ. विजय नानोटी, माजी उपसरपंच मा. उमेश बोपटे, पोलीस पाटील मा. कैलासराव अपोतीकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी लाभलेले मा. ॲड. मोतीसिंहजी मोहता साहेब यांनी कायदेविषयक मार्गदर्शन उपस्थितांना केले, त्याचबरोबर श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, श्री. दामोदरजी कडून गुरूजी, डॉ. उमेश बोपटे, श्री. प्रमोद बोपटे, आदि प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे ह्यांनी तर आभार प्रदर्शन सह–कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल यांनी केले.

**कार्यक्रम : प्रार्थना, स्फूर्ती गीत व सांस्कृतिक कार्यक्रम**

सायंकाळच्या सत्रात शिबिरार्थ्यांचे प्रार्थना व स्फूर्ती गीतांच्या माध्यमातून संस्कार घडवून त्यांच्यात मनोबल वाढविण्याचे काम केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढविण्याकरीता व त्यांचे व्यक्तिमत्व विकास करण्याकरिता प्रयत्न केले.

**गुरुवार, दि. १६.०३.२०२३**

**कार्यक्रम : ''उन्नत भारत अभियान : श्रमदान – बंधारा बांधणे''**

शिबिराच्या सहाव्या दिवशीच्या सकाळच्या सत्रात योगा, प्रभात फेरी व पथ नाट्याच्या सहाय्याने जनजागृती करण्यात आली. उन्नत भारत अभियान (UBA) अंतर्गत आखतवाडा तलाव येथे पक्षी निरीक्षण केल्या गेले. आखतवाडा नदीवर (बोरूला नाला) बंधारा बांधण्याचे कार्य केल्या गेले. १८ फूट लांबीचा, ३ फुट उंचीचा असा २१० पोत्यांच्या सहाय्याने बंधारा बांधण्यात आला. आखतवाडा चे सरपंच मा.श्री. दिलीप मोहोड ह्यांनी गावकऱ्यांसोबत मदतीचा हाथ दिला व हे कार्य यशस्वी करण्यात मदत केली. उन्नत भारत अभियान (UBA) अंतर्गत श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाने ५ गावं दत्तक घेतली आहे. आखातवाडा, सुलतानपूर, आपातापा, आपोती खुर्द आणि आपोती बुजुर्ग. ह्या पाच ही गावांचे व परिवारांचे सर्वेक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

**कार्यक्रम : ''भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार व कर्तव्ये''**
**सादरकर्ते : मा.प्रा. अरूण खेडकर (श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)**

''भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार व कर्तव्ये'' या विषयावर मार्गदर्शनासाठी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. अरूण खेडकर हे आले होते. भारतीय संविधान समजावून सांगतांना त्यांनी इतिहासातील घडामोडींचा सविस्तरपणे आढावा घेतला. भारतीय संविधान तयार करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांवरही त्यांनी प्रकाश टाकला. तसेच संविधानातील कायद्यांचे आपण सर्वांनी पालन केलेच पाहिजे असे प्रतिपादन सुद्धा त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन प्रसाद गुल्हाने तर आभार प्रदर्शन गौरव भटकर या विद्यार्थ्यांनी केले.

**कार्यक्रम : ''महिला मेळावा''**
**सादरकर्ते : मा.ॲड. ममता अ. तिवारी**
**(कायदे विषयक मार्गदर्शन : एक दिवसीय कार्यशाळा)**
**आणि Women Cell (श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)**

दुपारच्या सत्रात गावातील महिलांसाठी ''महिला मेळाव्याचे'' आयोजन करण्यात आले होते. ह्या मेळाव्यात गावातील महिलांकरिता एक दिवसीय कायदे विषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रोसेयो सह कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली गवांदे ह्यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांनी गावातील महिलांना करून दिला. या कार्यशाळेमध्ये गावातील महिलांमध्ये जनजागृती महिला सक्षमीकरण करून त्यांचे मनोबल वाढविण्याकरिता ह्या कार्यशाळेचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व प्रा. सोनाली गवांदे ह्यांनी व श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या वूमनसेल ह्यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. Resource Person म्हणून मा.ॲड. ममता अ. तिवारी ह्यांनी अतिशय सोप्या पद्धतीने महिलांना प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमासाठी सर्व महिला कर्मचारी उपस्थित होत्या. अतिथी वक्ते ॲड. ममता ए. तिवारी यांनी ४९८ कायदा, कौटुंबिक हिंसाचार आणि POCSO कायदा याबद्दल स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले आणि माहिती दिली. संपूर्ण कार्यक्रम खूप छान आणि माहितीपूर्ण होता. गावातील महिलांना प्रशिक्षण देण्यात आले जेणेकरून कि त्या महिलांना डोमेस्टिक वायोलंस व समाजात वाढलेल्या घटस्फोटांचे प्रमाण, ह्याबद्दल मार्गदर्शन केले. या महिला मेळाव्याचे अध्यक्ष प्रा. सुजाता ताडम मॅडम तर उद्‌घाटक म्हणून गावातील उप–सरपंच सौ. रेखा घोडे ह्या होत्या. त्याचप्रमाणे गावातील महिला तसेच श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. अर्चना सावरकर, श्रीमती वैशाली बडगुजर, डॉ. कविता हेडा, डॉ. अंजली सांगोले आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व मुली उपस्थित होत्या. कार्यशाळेच्या विविध सत्रांचे संचलन रासेयो सह–कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली गवांदे यांनी तर आभार प्रदर्शन रासेयोची मोक्षदा सावरकर हिने केले.

**कार्यक्रम : ''पाणथळ पक्ष्यांची माहिती व संवर्धन''**
**सादरकर्ते : मा.श्री. अमोल सावंत (NGO, निसर्ग कट्टा चे संचालक, अकोला)**

शिबिराच्या सहाव्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात मा.श्री. अमोल सावंत (NGO निसर्ग कट्टा चे संचालक, अकोला) ह्यांनी गावातील शालेय विद्यार्थ्यांचे व शिबिरार्थ्यांचे आपल्या भागातील जैवविविधतेबद्दल खूप सुंदर अशी माहिती देऊन मार्गदर्शन केले. आखतवाडा भागातील पाणथळ बद्दल माहिती दिली व तिथे स्थलांतर करून येणाऱ्या विविध पक्ष्यांची माहिती दिली व त्यांच्या कडून होणारे पर्यावरणाचे सांभाळ ह्याबद्दल विशेष मार्गदर्शन केले. पक्ष्यांमुळे पर्यावरणाचे संवर्धन कश्याप्रकारे केले जाते हे त्यांनी पटवून दिले.

**शुक्रवार, दि. १७.०३.२०२३**

**कार्यक्रम : ''आयुष्याची टाळेबंदी''**

**सादरकर्ते : डॉ. सुधीर कोहचाले (क्षेत्रीय समन्वयक, रासेयो, श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)**

शिबिराच्या सातव्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक व रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी आपल्या प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत प्रात्यक्षिके दाखवत आपत्तीला न डगमगता कशा प्रकारे सामोरे जाता येऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले. प्रथमत: डॉ. कोहचाळे यांनी आपत्तीची खरी ओळख करून दिली. आपत्तीचे प्रकार काय आणि कसे असतात हे स्पष्ट करून त्यावर प्रकाश टाकला. यानंतर प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत दोराच्या सहाय्याने आपण आपत्तीच्या काळात कशा प्रकारे वापर करून विविध गाठांचा उपयोग होतो, त्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अपघात झाला असेल तर पीडित व्यक्तिला कशाप्रकारे प्रथमोपचार द्यावा याचे प्रात्यक्षिक दिले. त्यानंतर पुनर्जिवितीकरण कशाप्रकारे करण्यात येते हे प्रात्यक्षिकांच्या स्वरूपात त्यांनी रासेयोच्या शिबिरार्थींना दाखविले. तसेच प्रशिक्षित स्वयंसेवक श्री. अंकित गोसावी यांनी सर्पदंश झाल्यास कशाप्रकारे सामोरे जावे याबाबतीत मार्गदर्शन केले. आपत्ती सांगून येत नाहीत आणि आपण जर आपत्तीनाच समजून घेतले आणि त्याची माहिती पूर्ण स्वरूपात ठेवली तर सर्व समाज जीवित आणि वित्तहानी पासून वाचू शकतो.

**कार्यक्रम : ''आपत्ती व्यवस्थापन''**

**सादरकर्ते : श्री. शैलेंद्र मढावी (प्रथमोपचार)**

शिबिराच्या सातव्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात श्री. शैलेंद्र मढावी व श्री. शंकेश झायटे (श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला) ह्यांनी आपत्तीच्या काळात कशा प्रकारे सावधगिरी बाळगावी व काय करावे ह्याबद्दल खूप सुंदर अशी कार्यशाळा घेतली. कार्यशाळे दरम्यान विविध उपयोगी बाबींची माहिती व प्रशिक्षण देण्यात आले. गावामध्ये नदीला पूर आलेला असतांना, आग लागली असतांना, अपघात झालेला असतांना प्रथमोपचार व काय उपाय योजना करावी ह्याचे गावकऱ्यांना प्रशिक्षण दिले.

**कार्यक्रम : ''आपत्ती व्यवस्थापन''**

**सादरकर्ते : श्री. शंकेश झायटे (आपत्ती व्यवस्थापन : सी.पी.आर.)**

गर्दीच्या ठिकाणी कोणाला जर Heart Attack आला किंवा बेशुद्धावस्थेत सापडले असतांना CPR च्या माध्यमातून प्रथमोपचार देऊन कसे प्राण वाचवायचे ह्याबद्दल प्रात्यक्षिक देऊन मार्गदर्शन केले.

**कार्यक्रम : ''सांस्कृतिक कार्यक्रम''**

शिबिरार्थ्यांच्या मनोरंजनाकरिता व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. गावकऱ्यांचे सुद्धा सहभाग लागले.

**शनिवार, दि. १८.०३.२०२३**

**कार्यक्रम : ''ई–लायब्ररी'' शाळेतील मुलांकरिता**

मा.श्री. सतीश र. जाधव, मुख्याध्यापक, क.बा.आ.वी., आपोती खुर्द ह्यांनी शिबिराच्या शेवटच्या दिवशी सकाळच्या सत्रात शिबिरार्थ्यांचे मार्गदर्शन केले. श्री. जाधव ह्यांना श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो कडून तब्बल ३०० पुस्तकांची सॉफ्ट कॉपी, म्हणजेच ई–लायब्ररी शालेय विद्यार्थ्यांकरिता प्रदान करण्यात आली. श्री. जाधव ह्यांच्या उपस्थितीत विद्यालयाच्या कॉम्प्युटर वर डॉ. जोशी, डॉ. मुंडे व श्री. जयस्वाल ह्यांनी अपलोड केली. त्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांना ई–लायब्ररीची संकल्पना सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी समजून देण्यात आली.

**कार्यक्रम : ''शिबिरार्थ्यांनी घेतले शिकवणी वर्ग''**

शिबिराच्या शेवटच्या दिवशी शिबिरार्थ्यांनी गावातील शालेय विद्यार्थ्यांचे शिकवणी वर्ग घेतले. शिक्षक संपावर असल्यामुळे शिकवणी वर्ग बंद पडल्याने, रासेयोच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील मुलांना शिकवणी वर्गाच्या माध्यमातून अभ्यास करण्याकरिता मदत केली व विविध धडे शिकविले.

**कार्यक्रम : ''शिबीर समारोप कार्यक्रम''**

दि. १८.०३.२०२३ रोजी रा.से.यो. शिबिराचा समारोप प्राचार्य डॉ. विजय नानोटी, प्रा. राम चव्हाण यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मि जोशी (सावलकर), डॉ. समाधान मुंडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल, प्रा. सोनाली गवांदे उपस्थित होत्या. शिबीर अहवाल यावेळी सादर करण्यात आला. शिबीरार्थींनी मनोगते व्यक्त केलीत. गावकऱ्यांच्या उपस्थितीत समारोप संपन्न झाला.

# वृत्तपत्र कात्रणे

# देशोन्नती

## आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे रासेयो शिबिर थाटात

### प्रार्थना, योगा व श्रमदान



**अकोला** ▪ दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित राधाकिसन लक्ष्मिनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालयाचे रासेयोचे विशेष शिबिर सत्र २०२२-२३ दत्तक ग्राम आपोती खुर्द येथे थाटात संपन्न झाले. ११ ते १८ मार्चदरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेचे रहिवासी शिबिराचे आयोजन थाटात करण्यात आले. ११ मार्च रोजी शिबिराची पूर्व तयारी म्हणून ग्रामसभा व बचत गट महिलांची सभा घेण्यात आली. १२ मार्च रोजी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी अध्यक्ष म्हणून दि. बीजीई सोसायटी अकोलाचे अध्यक्ष मोतीसिंग मोहता, अभिजित परांजपे, क. उपाध्यक्ष, दि. बीजीई सोसायटी अकोला हे प्रमुख पाहुणे होते, उद्घाटक म्हणून लाभलेले प्राचार्य डॉ. शांताराम बुटे, संस्थापक व अध्यक्ष, क.शि.प्र. संस्था, आपातापा हे होते. महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर व डॉ. समाधान मुंडे यांनी विविध कार्यक्रमांची आखणी करून या शिबिराचे आयोजन केले. त्यामध्ये सकाळच्या सत्रात दररोज प्रार्थना, योगा व श्रमदान करण्यात आले. महाविद्यालयाने उन्नत भारत अभियानांतर्गत पाच गावांना दत्तक घेतले आहे. आपातापा, अपोती खुर्द, अपोती बुद्रूक, आखतवाडा आणि सुलतानपूर. या ५ गावांपैकी एक गाव, आखतवाडा येथे श्रमदानाच्या माध्यमातून १८ मीटर लांबीचा व ३ फूट उंचीचा बंधारा, लोणार नदीवर बांधण्यात आला. गावचे सरपंच दिलीप मोहोड यांच्या सहकाऱ्यामुळे हे कार्य यशस्वी झाले. रासेयोच्या शिबिरार्थ्यांनी डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ. समाधान मुंडे तसेच कार्यक्रम सहअधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल, प्रा. सोनाली गवांदे यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण बंधारा बांधला. शिबिराच्या दुपारच्या बौद्धिक सत्रात विविध कार्यक्रम व प्रकल्प जसे, आरोग्य शिबिरे, पर्यावरण संवर्धनविषयी जनजागृती, कायदेविषयक मार्गदर्शन, ग्राम स्वच्छता व आरोग्य संवर्धन करणे तसेच प्लास्टिक बंदी करण्याकरिता पथ-नाट्य व प्रभात फेरीच्या माध्यमातून जनजागृती असे विविध प्रकल्प राबविण्यात आले.



दत्तक गावातील शाळेला, महाविद्यालयाच्या रासेयोकडून २५० पुस्तकांची ई-लायब्ररी देण्यात आली, जेणेकरून ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकं उपलब्ध होतील. उन्नत भारत अभियानअंतर्गत शेतकरी मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये रेशीम शेती व मधमाशी पालन या शेतीपूरक जोडधंदे म्हणून सुरुवात केल्यास, कसे फायद्याचे आहेत हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. अकोला रेशीम विकास अधिकारी पी.बी. नरवाडे व सुनील मानकर यांनी या कार्यशाळेमध्ये रेशीम शेतीकरिता मिळणाऱ्या विविध योजनांबद्दलची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. महिला मेळाव्यात महविद्यालयातील वूमन सेल व आयसीसी आणि सर्व महिला शिक्षक वर्ग यांनी गावातील महिला तसेच विद्यार्थिनीकरिता अधिवक्ता ममता तिवारी यांनी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन केले.

# देशोन्नती

# युवा शक्तीनी सृजनशील बनावे : गायत्री परिवार

## आरएलटीच्या रासेयो शिबिरात मार्गदर्शन




**अकोला** ▪ युवकांनी आपल्या मनातून नैराश्य आणणाऱ्या विचाराना मुळापासून उपटून फेकने जरुरी आहे. आपल्या शक्तीवर,स्वयं क्षमतेवर विश्वास जागविणे जरुरी आहे असे विचार करावे. जगात असे कोणतेही कार्य नाही जे मी करू शकत नाही . आपल्या आत या प्रकारचे आत्मविश्वास दृढतापूर्वक स्थापित केल्याने आम्ही जीवनात येणाऱ्या अनेक संघर्षाचे सामने करण्यात सफल होऊ शकतो, असा हितोपदेश गायत्री परिवारतर्फे डॉ.अजय उपाध्याय यांनी रासेयो स्वयंसेवकांना दिला.

जीवनात परिश्रम,प्रचंड मेहनत, दिनचर्या व्यवस्थित, स्वाध्याय, साधना, संयम, सेवेला उतरवून सृजनशील विचारांना धारण करून प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरविणे आवश्यक आहे 'स्वयं बना व इतरांना बनवा' 'बी अँड मेक' असे प्रतिपादन गायत्री परिवार अकोला चे डा अजय उपाध्याय यांनी आरएलटी विज्ञान महाविद्यालय अकोलाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीर आपोती खुर्द येथे आयोजित शिबीरात केले. यावेळी ढपली तालावर व्यसनमुक्ती, युवा जागरण, जीवन देवता साधना, आरोग्य साधना, विचार क्रांती अभियानचे प्रज्ञा गीत प्रा. जयस्वाल यांनी सादर केले. डॉ.अजय उपाध्याय व प्रा .विजय रुईवाले यांनी केले सर्व विद्यार्थ्यांनी हाथ उंचावून सेवाव्रत ( मातृ पितृ ऋण, आचार्य ऋण, व समाज ऋण) संकल्प घेतले. प्राचार्य विजय नानोटी, डॉ. रश्मी जोशी , डॉ .समाधान मुंडे, प्रा. विजय रुईवाले, प्रा. जयस्वाल , प्रा. डॉ. कोहचाळे यांनी अखिल विश्व गायत्री परिवार द्वारा चालविणारे युवा जागृती अभियानाचे कौतूक केले.



# छायाचित्रे



दि. ८.३.२०२३ रोजी ग्रामसभा घेऊन शिबिराची माहिती देण्यात आली. सरपंच, महिला प्रतिनिधी व सदस्य.




दि. ११.३.२३ ला फित कापून उद्घाटन करतांना मान्यवर






उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.ॲड. श्री. मोतीसिंहजी मोहता, अध्यक्ष, दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला




"Role of Gender Equality in Society" ह्या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले.




मा.श्री. जीवन देशमुख ह्यांचे ''मूल्यशिक्षण व व्यक्तिमत्व विकास'' ह्या विषयावर मार्गदर्शन







मा. कल्याणी सिंग ह्यांनी NGO क्षितीज फाऊन्डेशन अंतर्गत महिलांचे व्यायाम व पोषण आहार बद्दल मार्गदर्शन केले




स्पर्धा परीक्षेबद्दल मार्गदर्शन करतांना वक्ते





शिबिराच्या प्रत्येक दिवशी सकाळच्या सत्रात
प्रभात फेरी, व्यायाम व ग्राम स्वच्छता.









प्रभात फेरी दरम्यान गावातील लोकांमध्ये स्वच्छते बद्दल पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करतांना विद्यार्थी.
गावात जागोजागी पथ नाट्याचे सादरीकरण करण्यात आले.










दि. १४.३.२०२३ रोजी एनएसएस च्या विशेष शिबिरात 'उन्नत भारत अभियान' अंतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.







दि. १४.३.२०२३ रोजी (NCD checkup कॅम्प) नॉन कम्युनिकेबल डिसीज आरोग्य शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये रक्ताचे नमुने घेऊन मधुमेह तपासणी, रक्तदाब व इतर तपासण्या करण्यात आल्या. ४० गावकऱ्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली.








'निक्षय योजना' बद्दलची माहिती व व्याख्यान, डॉ. अनुपमा गवई

श्रमदान करतांना कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी




श्रमदान करतांना रासेयोची चमू, बंधारा बांधण्याकरिता पोती भरतांना विद्यार्थिनी






शालेय विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासणी शिबिर, डॉ. हरीश मालपाणी व चमू.







''भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार व कर्तव्ये'' ह्या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

स्थलांतर करून येणाऱ्या पाणथळ पक्ष्यांची माहिती देतांना श्री. अमोल सावंत (निसर्ग कट्टा)







दि. १६.३.२०२३ रोजी महिला मेळावा मध्ये श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला चे वूमन सेल आणि ICC आणि प्रमुख वक्ते होते. या कार्यक्रमासाठी सर्व महिला कर्मचारी उपस्थित होत्या. अतिथी वक्ते ॲड. ममता ए. तिवारी यांनी 498 कायदा, कौटुंबिक हिंसाचार आणि POCSO कायदा याबद्दल स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले आणि माहिती दिली.








आखतवाडा चे सरपंच मा.श्री. दिलीप मोहोड, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे व श्री. शैलेश जयस्वाल आणि रासेयो ची चमू, बंधारा पूर्ण बांधल्यावर.







DMC ची कार्यशाळा, त्यात मा.डॉ. सुधीर कोहचाळे, प्रा.श्री. शैलेंद्र मडावी, प्रा.श्री. शंकेश झायटे व रासेयो ची चमू






ई–लायब्ररी ची संकल्पना विद्यार्थ्यांना सांगतांना कार्यक्रम अधिकारी व मुख्याध्यापक श्री. जाधव






शिकवणी वर्ग घेतांना रासेयो चे विद्यार्थी







उन्नत भारत अभियान चे फलक ग्राम पंचायत मध्ये लावण्यात आले व प्रभात फेरी दरम्यान गावकऱ्यांना UBA बद्दलची माहिती देण्यात आली.







दि. १८.३.२०२३ रोजी समारोप कार्यक्रमात महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी, वरिष्ठ प्रा. श्री. राम चव्हाण, कार्यक्रम अधिकारी व रासेयो गट प्रमुख



**डॉ. रश्मी जोशी सावलकर**
**डॉ. समाधान मुंडे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना